महाराष्ट्र शासन
कृषी विभाग
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
३० अ/ ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई -४०० ००५
दुरध्वनी क्र. : ०२२ २२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

नस्ती क्र. NDKSP-12041(29)/24/2025-O/O ADM-NDKSP/2765771 दि.२८/०४/२०२६

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
(प्रकल्पातील समाविष्ट सर्व २१ जिल्हे)

**विषय: नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.० अंतर्गत रिक्त असलेल्या 'समूह सहायक' पदाशी संबंधित गावसमूहाचे कामकाज सहायक कृषी अधिकारी यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात सोपवण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत बहुतांश प्रकल्प गाव समूहांमध्ये 'समूह सहायक' यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समूह सहायकाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

२. समूह सहायकांची नियुक्ती करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. मात्र, असे निदर्शनास येत आहे की, काही गावसमूहांमध्ये नियुक्त केलेले समूह सहायक हे विहित मुदतीत रुजू होत नाहीत अथवा काही कालावधीनंतर वैयक्तिक किंवा तांत्रिक कारणास्तव राजीनामा देत आहेत. त्यामुळे समूह सहायकांची पदे रिक्त राहतात. समूह सहायकांची पदे रिक्त राहिल्यामुळे, संबंधित गावसमूहातील प्रकल्पाची कामे, शेतकरी नोंदणी, डीबीटी (DBT) प्रक्रिया आणि इतर क्षेत्रीय कामकाजावर प्रतिकूल परिणाम होत असून कामात खंड पडत आहे. प्रकल्पाचे कामकाज विहित वेळेत पूर्ण करणे अनिवार्य असल्याने, जोपर्यंत नवीन नियुक्ती होत नाही, तोपर्यंत पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

३. तरी, ज्या गावसमूहात समूह सहायकाचे पद रिक्त आहे, त्या गावसमूहातील कामकाज नजिकच्या कमी कामभार असलेल्या कार्यरत समूह सहायकाच्या मदतीने, सहायक कृषी अधिकारी यांनी ग्राम कृषी विकास समितीची बैठक आयोजित करावी. सदर बैठकीमध्ये सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषी विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करावेत व मान्यता प्राप्त अर्ज पुढील स्तरावर (डेस्कवर) पाठविण्याची कार्यवाही करावी. तसेच, रिक्त असलेल्या समूह सहायक पदावर नियमित समूह सहायकाची नियुक्ती झाल्यानंतर, सदर गावसमूहासाठी केलेली पर्यायी व्यवस्था तात्काळ समाप्त करावी. नवीन नियुक्ती झाल्यावर, संबंधित सहायक कृषी अधिकारी यांनी त्या गावसमूहाचे अतिरिक्त कामकाज पाहू नये; केवळ नियुक्त समूह सहायकामार्फतच नियमित कामकाज करून घेण्यात यावे.

४.	प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यरत सहायक कृषी अधिकारी व समूह सहायक यांना आवश्यक सूचना देण्याबाबत व मार्गदर्शन करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. तसेच, त्यांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेण्यात यावा.

(विक्रमसिंह यादव)
वित्त विशेषज्ञ
तथा प्रकल्प उपसंचालक

**प्रत: माहितीसाठी,**

१) विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पातील समाविष्ट सर्व ५ विभाग)
२) उपविभागीय कृषी अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व ५५ उपविभाग)